विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१

w'site : www.dydepune.com
e-mail : 11thonlineadmissiondydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

महाराष्ट्र शासन

जा.क्र.शिउसं/उमाशि-४०३/११ वी १९-२०/पुवि/२०१९
दिनांक :- 20 JUN 2019

प्रति,

सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य,
उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,
पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र

विषयः-१) प्रवेश क्षमतेच्या १० टक्के वाढीव प्रवेशाबाबत
२) इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१९-२० मधील नोंदणी केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील व्यवस्थापन कोटा (Management Quota) प्रत्यार्पित (Surrender) करणेबाबत....

संदर्भः- १) शासन निर्णय क्र-प्रवेश-२०१६/(१८०/१६)/एसडी-२,दि.०७.०१.२०१७.
२) शासन निर्णय क्र-प्रवेश-२०१९/प्र.क्र.३३३/एसडी-२,दि.०७.०३.२०१९.

उपरोक्त विषयानुसार इ. ११वी ऑनलाईन प्रवेश-२०१९-२० चे कामकाज पुणे, मुंबई सह नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपूर या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय ०७.०३.२०१९ अन्वये सुरु करण्यात आलेले आहे. ज्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१८-१९ मधील दुस-या फेरीचा कटऑफ ८५ टक्याच्या पुढे आहे, अशा कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्याकडे अतिरिक्त विद्यार्थी समायोजित करण्याची क्षमता असल्यास अशा महाविद्यालयांनी आपल्या प्रवेश क्षमतेच्या १० टक्के वाढीव प्रवेशाबाबत चे मागणी पत्र त्वरीत कार्यालयातील श्री.जगताप के.जी. वरिष्ठ लिपीक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे यांचेकडे जमा करावेत.

तसेच ज्या कनिष्ठ महाविद्यालयांना आपला व्यवस्थापना कोटा (Management Quota) (५टक्के) प्रत्यार्पित (Surrender) करावायाचा आहे, त्यांनी तसे पत्र या कार्यालयात श्री.जगताप के.जी. वरिष्ठ लिपीक , शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे यांचेकडे जमा करावेत. यापूर्वी ज्या कनिष्ठ महाविद्यालयांनी आपला व्यवस्थापन कोटा (Management Quota) (५टक्के) प्रत्यार्पित (Surrender) केलेला आहे, अशा कनिष्ठ महाविद्यालयांनी दर्शनी भागात व्यवस्थापना कोटा (Management Quota) (५टक्के) प्रत्यार्पित (Surrender) केलेला आहे असा फलक व शिक्षण उपसंचालक कार्यालयास व्यवस्थापना कोटा (Management Quota) (५टक्के) प्रत्यार्पित (Surrender) करणेबाबत दिलेल्या पत्राची छायांकित प्रत लावावी. याबाबत कोणतीही तक्रार उद्भवणार नाही याची दक्षता घ्यावी.

(मिनाक्षी राऊत)
अध्यक्ष
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
प्र.शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**
१) मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१
२) मा. शिक्षण संचालक (माध्य व उच्च माध्यमिक) म.रा.पुणे-१

Scanned by CamScanner